# भिवंडीतील भीषण आगीत २६ गोदामे जळून खाक

## नऊ अग्निशमन जवान जखमी, चार अत्यवस्थ

खास प्रतिनिधी

ठाणे

भिवंडी तालुक्यातील वळ गावच्या हद्दीत पद्मावती कंपाऊंडमधील आनंद वेअर हाऊस या गोदामातील रासायनिक द्रव्याने आज दुपारी अचानक पेट घेतल्याने लागलेल्या भीषण आगीत २६ गोदामे जळून खाक झाली आहेत. भिवंडी, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ येथील अग्निशमक दलाच्या जवानांनी बराच काळ प्रयत्न करूनही आग आटोक्यात येत नसल्याने परिसरात घबराट पसरली होती. आगीशी झुंजताना अग्निशमन दलाचे नऊ जवान जखमी झाले असून त्यातील चारजण अत्यवस्थ आहेत.

दुपारी दोनच्या सुमारास गोदामास आग लागली आणि रसायनांनी भरलेले ड्रम हवेत तब्बल ८० फूट उंच उडू लागले. काही वेळेतच आगीने रौद्र रूप धारण केले आणि परिसरातील २६ गोदामांमध्ये ती पसरली. या आगीमुळे कोट्यवधी रुपयांची मालमत्ता जळून खाक झाली असावी असा अंदाज आहे.

या भीषण आगीची वार्ता मिळताच मुंबई, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ येथून अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी आले. त्यांनी भिवंडीतल्या जवानांच्या साथीने आग विझविण्यास सुरुवात केली. एम.जी. परब, एस.पी. बोंबे, जे.टी, बोराडे, मुख्तार अली, पी.एम.जोशी, सोमनाथ रासकर, शिवाजी म्हात्रे, गुरचरण पंडुरे आणि के.आर. तांबोडे अशी जखमी जवानांची नावे असून त्यांना उपचारांसाठी इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यातील चारजणांची प्रकृती चिंताजनक आहे.